
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY – 2017

# 'पर्व' कादंबरीतील व्यक्तिरेखा व त्यांचे सामाजिक मूल्यमापन




प्रा. किशोर यादवराव बुटले
मराठी विभागप्रमुख, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ.

## प्रास्ताविक :

'पर्व' या डॉ. एस.एल. भैरप्पा यांच्या कन्नड कादंबरीचा मराठी अनुवाद नव्हे. सशर्त अनुवाद पुणे येथील डॉ. उमा कुलकर्णी यांनी केला. कादंबरीच्या मलपृष्ठावर त्यांचा अभिप्राय आहे. तो असा, 'व्यासरचित महाभारतील आभाळाएवढी उंचीची पात्रे, परंतु सगळ्यांचे पाय मातीचेअवघी जीवनमूल्ये कसोटीला लावणारे समरप्रसंग, संघर्ष, प्रत्येकाचे व्यक्तिमत्व वेगळे त्याचबरोबर अनेक चमत्कार, दैवी पाप, दैवी वर, मानवी पातळीपेक्षा वेगळ्या पातळीवर जाणारे कथानक' हा त्यांचा अभिप्राय खूप काही सांगून जाते. भैरप्पांनी 'पर्व' लिहितांना महाभारतापेक्षा काही वेगळ्या अंगाने बदल केले. ते महत्त्वाचे आहे. कथा सूत्रात काही बदल न करता व्यक्तिरेखांच्या चित्रणांमध्ये बदल केले.'पर्व' मध्ये निवडलेला विषय महाभारत कथेतील राजकारण, घटना–प्रसंग, त्या पात्रांचे काळाच्या दृष्टीने केलेले मूल्यदर्शन याचा आधुनिक अंगाने शोध घेण्याचा प्रयत्न केला. 'पर्व' युद्ध व युद्धाची कथा केंद्रबिंदू मानून पात्रांचे चित्रण केले आहे.'आपल्या कुठल्याही पात्रावर प्रेम करायचं नाही आणि द्वेष करायचा नाही, त्याला पूजनीय करायचं नाही, याची जाणीव माझ्या मनात पहिल्यापसून आहे, असे भैरप्पा प्रस्तावनेतच म्हणतात आणि ही तटस्थता या कादंबरीतही जाणवते.

कथानक विचार व व्यक्तिदर्शनाने कादंबरीची संरचना उभी राहते. कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार असल्यामुळे त्यात सांगण्याजोगा मजकूर भरपूर असतो. या मजकुराला आपण कथानक असे म्हणतो. 'पर्व' ही महाभारतावरील कादंबरी असल्यामुळे यामध्येही सांगण्याजोगा मजकूर भरपूर आहे. तसा भैरप्पांनी तो सांगितलाही आहे. 'पर्व' मध्ये घटना, प्रसंग, पात्रे निवेदनपद्धती या सर्वांचा कलात्मकरित्या समावेश केलेला आहे. हा भैरप्पांनी 'पर्व' कादंबरीत एखादी व्यक्तिरेखा न निवडता मूळच्या महाभारतातील वास्तव आणि मूळची व्यक्तिचित्रणे यांचा वेगळ्या अंगाने शोध घेण्याचा प्रयत्न केला. महाभारत ही मुख्यतः भारतीय युद्धाची कथा, या दृष्टीने युद्ध केंद्रस्थानी ठेवून व्यक्तिरेखांचे चित्रण त्यांनी कलेले आहेत. यातील व्यक्तिदर्शन व महत्त्वाची पात्रे क्रमवारीने पाहता येईल.

## भीम :

महाभारताचे लेखक महर्षी वेद व्यास यांच्या पुढे जाऊन डॉ. एस.एल. भैरप्पा यांनी भीमाचे व्यक्तिचित्रण 'पर्व'मध्ये केलेले आहेत. मोठी शरीरयष्ठी, महापराक्रमी, शूर, वीर असा भीम वेळप्रसंगी चार नम्र गोष्टी इतरांना सांगण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याचा ठिकाणी असणारा 'भीम–पराक्रम' लेखक कोठेही कमी पडू देत नाही. भीम 'पर्व' मध्ये एके ठिकाणी म्हणतो, ''आता पोहायला गेलो

होतो. पण केवढसं पाणी! गंगा नदीची आठवण झाली. तेव्हाच मनाशी ठरवलं, यापुढं भीम गंगेतच पोहेल. यमुनेत नाही.'' अशा प्रकारे त्याच्या बोलण्यावरून त्याचे व्यक्तिमत्त्व मोठेच असल्याचे दिसून येते.

जसं शिवाजी सावंतांना 'कर्ण' मोठा वाटला. त्यांनी तो 'मृत्युंजय' या लोकप्रिय कादंबरीतून रेखाटला. तसाच भैरप्पा यांना 'भीम' मोठा वाटला आणि तो 'पर्व' मधून रेखाटला. हे रेखाटत असतांना तो मूळच्या महाभारतातील व्यक्तिरेखेपेक्षा कितीतरी पटीने सरस आणि मोठा वाटतो. कादंबरीत गाई—बैलांचा उल्लेख आल्यामुळे तेव्हा कृषी—संस्कृती अस्तित्वात असल्याचा पुरावा मिळतो. मांसाहार करण्याची पद्धत होती हे ही दिसून येते. भीमाला तर मांसाहार विशेष आवडत होता. भीमाचा मुलगा नील राक्षस कुलातला असल्यामुळे या कुलाचे अस्तित्त्व या कादंबरीतून दिसून येते. त्यांची पात्रेही तशीच दिसते. भीमाला या कुलातल्या राक्षसांबद्दल कुतूहल वाटते. परंतु मुलगा नील याला वाटत नाही. भीमाचे सैनिकही या कुलाला घाबरतात. या कुलातले 'बकासूर' नावाचे राजाचे पात्र यात येते. या लोकांना जेवनाचे वेळी गाडाभर रूचकर अन्न, बैलांची व रेड्यांची जोडी आणि एक माणूस हा त्यांचा आहार असतो. ते ही प्रत्येक वेळेला या कुलाशी भीमाचा जवळून संबंध येतो. त्यामुळे या कादंबरीतील पात्रे कुठे—कुठे गुढ वाटायला लागते. परंतु पात्रे ओळखीची असल्यामुळे वाचक उत्साहाने पुढे जातात. भैरप्पांनी भीमाचे पात्र रंगवितांना या पात्राभोवती राक्षस कुलाचा आधार घेऊन कादंबरीचे कथानक रंजक करण्याचा प्रयत्न केला. परंतु वास्तवात या कथानकाला काही अर्थ उरत नाही. परंतु भैरप्पांच्या मार्मिक भाष्याला मात्र वास्तवाचा आधार वाटतो. 'भेकड राजाला राज्य रक्षणाचं काम करता येत नाही आणि राक्षसापासून प्रजेचं रक्षण करायची इच्छाही होत नाही. उलट राक्षसांचेच सहायानं विजय मिळवून आनंद मिळवणार!' भैरप्पा पुढे छान भाष्य करतात, 'अयोग्य माणूस अधिकारावर आला, की दुसरे काय होणार?' यामुळे 'पर्व' कादंबरीतले व्यक्तिदर्शन खुलत जाते.

भीमाने नीलाला सांगितलेली मुष्टियुद्धाची कथा, दौपदीला उचलून पळवून घेऊन जाण्यासाठी आलेला सैंधवाला पकडून, त्याचं डोक भादरून, किचकाच्या हाडा—मासांचा लगदा भीमाने केला. यापेक्षा कितीतरी पटीने भीम पराक्रमी आहे, एकाच तडाख्यात अंधु पुत्रांना भीम चिरडून टाकेल. अशा प्रकारचे व्यक्तिचित्रण भैरप्पांनी भीमाचे केलेले आहे.

### कृभण :

डॉ.एस.एल भैरप्पा यांनी 'पर्व' कादंबरीतील कृभणाच्या पात्राला दैवत्त्वाचा मुलामा न देता अतिशय वास्तवाच्या पातळीवर आणून कृभणाचे व्यक्तिचित्रण केले. कृभणाकडे असलेच्या चार्तुयाला आणि धैर्याला तोड नाही. त्याच्याकडे असलेली युद्धनीती, बुद्धिमत्ता, पांडित्य, समयसूचकता ह्या अजोड गोष्टींनी त्याचे व्यक्तिमत्व प्रभावी दिसते. असे असूनही येथील 'पुरान्या' लेखकांनी त्याला दैवत्त्वाचा मुलामा अधिक प्रमाणात चढवून सारासार विचार न करता मंदिराच्या चार भिंतीआड बंदिस्त करून ठेवले. क्षत्रिय कुलातला हा बहुजनांचा महानायक, शेती कसणाऱ्या म्हणजे कुणब्यांचा हा प्रेरणास्रोत असलेला आदर्श युगपुरूष 'देव' म्हणवून मंदिराच्या चार भींतीआड बंदिस्त झाल्याने किंबहूना केल्याने वास्तवातला कृष्ण नामशेष झाला. परंतु भैरप्पा यांनी कृष्णाला पहिल्यांदा वास्तवाच्या पातळीवर आणण्याचे काम 'पर्व' मधून केले.

महाभारत तसा जगभरातील जिज्ञासू लोकांचा अभ्यासाचा विषय. भैरप्पा त्यापैकीच एक. महाभारतातील प्रसंग जसेच्या तसे न घेता वास्तविकतेच्या अंगाने स्पर्श करून त्यांनी 'पर्व' ही पौराणिक कादंबरी लिहली. पुराणात जसे चमत्कार, स्वर्ग—नरक, पाप—पुण्य ह्या कल्पना आल्या तशाच किंबहुणा थोडा बदल करून भैरप्पांनी त्या 'पर्व' कादंबरीत घेतल्या. एखादा महाभारतातील प्रसंग अधिक खुलवून सांगायचा असल्यास भैरप्पा तो प्रसंग अधिक खुलावट करून पाहतात. उदा. श्रीकृष्ण — गांधारी भेट, 'पर्व' कादंबरीत असलेली भीमाची व्यक्तिरेखा. कधी—कधी भैरप्पा तर महर्षी व्यासांच्याही पुढे जाऊन त्यांच्या प्रचलित धारणांना, विचारांना, कल्पनांना तडा देऊन त्या व्यक्तिला वेगळ्या रूपात मांडण्याचे कसब साध्य करतात. तसा ही महाभारत या पुराणकथेतील भीम उपेक्षितच. परंतु भीमाला भैरप्पांनी फार मोठी प्रतिष्ठा 'पर्व' कादंबरीत प्राप्त करून दिली. किंबहुणा त्याचे व्याक्तिमत्त्व प्रभावीपणे जगासमोर मांडले. युद्धाचे प्रसंगही असेच. वेगळ्या अंगाने म्हणजे योध्यांच्या भाव भावनांचा मागोवा घेऊन जगासमोर मांडले. महाभारतातील काही सुटलेले दुवे घेऊन त्या दुव्यांचा विस्तार वास्तवाच्या अंगाने करून कथानक मांडले. म्हणून रसिक वाचकांचा ताबा 'पर्व' या पौराणिक पात्रांचा आधार घेऊन भैरप्पांनी प्राचीन हिंदु धर्म—संस्कृतीचा विचार वाचकांच्या मनावर टाकला. त्याला तोड नाही. पांडुराजाच्या मृत्यूचे वर्णन तर वाचकाला अचंबीत करून सोडते. इतक्या ताकदीने भैरप्पांनी ते रेखाटले आहे. हे सर्व वाचतांना मन सुन्न होते. मनात करूण रस ओतप्रोत भरल्या जातो. सूचनावजा संस्काराच्या दोन गोष्टीही सांगितल्या जातात. पांडवांची आई म्हणते, ''या वंशातल्या इतरांसारखे होऊ नका. दासींच्या

मागे जाऊ नका. अतिकामुकतेचे बळी होऊ नका.'' चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''भैरप्पांची 'पर्व' वाचली आणि त्यांच्या थोरपणाची प्रचीती आली.''

**समारोप :**

महाभारतातील पात्रांचे जबरदस्त सामर्थ घेऊन आकाराला आलेली 'पर्व' ही डॉ.एस.एल. भैरप्पा यांची लक्षणीय कादंबरी आहे. आजपर्यंत भारतातील सर्व भाषांत महाभारतातील पात्रांवर, घटनाक्रमांवर अनेक कलाकृती निर्माण झाल्या आहेत. सुप्रिया सहस्रबुद्धे म्हणतात, ''महाभारत या ग्रंथाच्या बिजातून असंख्य लतावेली, वृक्ष आणि महावृक्ष उभे राहिले आहेत. वेगवेगळ्या युगातल्या आणि समाजातल्या प्रतिभावंतांनी आपापल्या काळाच्या, अभिरूचीच्या दृष्टिकोनातून, वैचारिक लेखनातून किंवा ललित कृतीतून त्याची चिकित्सा केली आहे.''

परदेशातील लेखकांनीसुद्धा महाभारतावर लेखन केलेले आहे. हे सर्व लेखन करतांना त्या–त्या लेखकांनी वेगवेगळ्या अंगांनी काही बदल केले. कुणी पात्रांवर शेंदूर फासून त्यांचे उन्नयन केले तर कुणी पात्रांवरचा शेणा–मातीचा गिलता जसाच्या तसा ठेवण्यात यश मिळविले. यामध्ये एक महत्त्वाचे नाव डॉ. एस.एल. भैरप्पा यांचे घेता येईल. महाराष्ट्रातील अग्रगण्य दै. 'लोकमत'नेही यथोचित 'पर्व' बद्दल अभिप्राय दिला; तो असा 'भैरप्पांच्या अनेक कादंबऱ्या गाजल्या. यातल्या प्रत्येकच कादंबरीने त्यांना वाचक वर्ग वाढवला. चाहत्यांचा वर्गही मोठा केला.पण भैरप्पांना खरा मान व कीर्ती लाभली ती त्यांनी महाभारतावर लिलेल्या 'पर्व' या कादंबरीमुळे.यावरून 'पर्व' कादंबरीचे भारतीय वाङ्मय विश्वातील स्थान मोठे असल्याची प्रचिती येते. म्हणूनच बी.बी.सी. चॅनेलवरून भैरप्पा जागतिक पातळीवर पोहचेल हा त्यांचा यथार्थ गौरव आहे.

**संदर्भग्रंथ :**

१. कऱ्हाडे सदा, 'भाषांतर', लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, जुलै १९९२,
२. पठारे रंगनाथ, 'जागतिकीकरण आणि देशीवाद', लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रथम आवृत्ती, २०००
३. नेमाडे भालचंद्र, 'साहित्याची भाषा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९८७
४. कुलकर्णी उमा, (अनु.), 'पर्व', (मूळ ले. एस. एल. भैरप्पा), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, चौथी आवृत्ती, ऑगस्ट, २००३
५. बांदिवडेकर चंद्रकांत, मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, व्दितीय आवृत्ती, ऑक्टो, १९९६
६. दै. 'लोकमत', दिवाळी अंक, २००६